दुरध्वनी क्र.२८१९३०८७,
अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (कर)
यांचे कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका,
भाईंदर (प.), ता.जि.ठाणे ४०११०१.
जा.क्र.माअधि/अपिल/७०/२०१९
दि.१९/०६/२०१९.

01C

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (कर), मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) अंतर्गत दाखल झालेले प्रथम अपील.**

श्री.निलेश संपत फापाळे,
स्वप्न घर, घोडबंदर गाव,
पो.मिरे, ता.जि.ठाणे ४०११०७.
............अपिलार्थी

जनमाहिती अधिकारी तथा,
कर निरिक्षक, प्रभाग क्र.४.
...............प्रतिवाद

## -: विवेचन :-

श्री.निलेश संपत फापाळे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार जनमाहिती अधिकारी तथा कर निरिक्षक, प्रभाग क्र.४ यांचेकडे दि.०८/०५/२०१९ रोजीच्या अर्जान्वये खालील माहिती मिळणेबाबत अर्ज सादर केला

१) ग्रीन व्हेली स्टुडिओ मालकाने कर आकारणी बाबत सादर केलेल्या संचिकेच्या छायांकित प्रती मिळाव्यात.
२) कर आकारणीसाठी अर्ज आल्यापासून आजपर्यंत आपल्या विभागातील सादर अहवाल, टिप्पणी, मंजुरीच्या छायांकित प्रती मिळाव्यात.
३) सदर कर आकारणीचे बिल प्रती मिळाव्यात.
४) स्टुडिओचे फोटो मिळावेत.

**अपिल दाखल करण्याची कारणे:-**
माहिती अधिकार अंतर्गत माहिती देण्यास जाणीवपूर्वक टाळाटाळ केली असल्याने तसेच झालेला भ्रष्टाचार लपविण्याचा पूरेपूर प्रयत्न केलेला आहे. तसेच कामामध्ये दिरंगाई केली असल्यामुळे अपिलार्थी यांनी दि.१३/०६/२०१९ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (कर) यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले.

**सुनावणीचा तपशिल:-**
अपिलार्थी व जनमाहिती अधिकारी तथा जनमाहिती अधिकारी तथा कर निरिक्षक, प्रभाग क्र.४, यांना प्रथम अपिलाच्या सुनावणीस दि.१९/०६/२०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता उपस्थित राहणेबाबत जा.क्र.मिभामनपा/उपआ.कर/१०३/२०१९ दि.१४/०६/२०१९ अन्वये कळविण्यात आले आहे.

सबब, जनमाहिती अधिकारी तथा जनमाहिती अधिकारी तथा कर निरिक्षक, प्रभाग क्र.४, व अपिलार्थी अर्जदार सुनावणीस उपस्थित आहेत.

प्राप्त दिनांक २०।६।१९
विभागीय कार्यालय कनाकिया
प्रभाग समिती क्र. ४
मिरा भाईंदर महानगर

Scanned by CamScanner

१) **अपिलार्थी यांचा सुनावणी दरम्यान युक्तिवाद**:- माझ्या दि.०८/०५/२०१९ रोजीच्या अर्जानुसार मला आवश्यक ती माहिती व कागदपत्र दिलेले नाहीत. सदर माहिती देण्यात जाणीवपूर्वक टाळाटाळ केली आहे. झालेला भ्रष्टाचार लपविण्याचा पुरेपुर प्रयत्न केलेला आहे. तसेच कामामध्ये दिरंगाई केलेली आहे.

मा

२) **जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान केलेला युक्तिवाद:-** अपिलार्थी अर्जदार यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल.

वरील वस्तुस्थिती विचारात घेऊन खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

**-: निर्णय :-**

१) जनमाहिती अधिकारी तथा कर निरिक्षक, प्रभाग क्र.४, यांनी अपिलार्थी अर्जदारास मुद्देनिहाय माहिती १० दिवसांत विनाशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी. वरील निर्देश देऊन अपिल निकाली काढण्यात येत आहे.

२) सदर आदेशाविरुध्द अपील करावयाचे असल्यास मा.राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, कोकण खंडपीठ, ५ वा मजला, दालन क्र.५२८, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ यांच्याकडे सदर आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत अपील दाखल करता येईल.

**(दिपक पुजारी)**
**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उपायुक्त (कर)**
O/C **मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रति:-**

१) श्री.निलेश संपत फापाळे,
स्वप्न घर, घोडबंदर गाव,
पो.मिरे, ता.जि.ठाणे ४०११०७.

फापाळे

२) जनमाहिती अधिकारी तथा
कर निरिक्षक, प्रभाग क्र.४

३) माहिती अधिकार अपिल नस्ती
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (कर) यांचे कार्यालय.

Scanned by CamScanner